# ECHO OF HIS CALL

## त्याच्या बोलाविण्याचा प्रतिध्वनी MARATHI

India's National Spiritual Newspaper

₹ 10/-

Published monthly in ENGLISH, TAMIL, MALAYALAM, TELUGU, HINDI, KANNADA, MARATHI, BENGALI, GUJARATI, ODIA, ASSAMESE, PUNJABI, NEPALI, URDU, SINHALA & AFRIKAANS

Editor : S. SAM SELVA RAJ | 16 Languages | Associate Editor : Rev. Shashi Tiwari

VOL: XXII | YEAR OF OUR LORD JESUS CHRIST, JANUARY 2020 | NO. 3


**पवित्र शास्त्र**

कृपया हा शास्त्रभाग पाठ करा

**प्रभुची स्तुती असो**

**स्तोत्र ७१:१-८**

१) हे परमेश्वरा मी तुझा आश्रय धरिला आहे, मी कधी लज्जीत होऊ नये.

२) आपल्या न्यायाचराने मला उध्दर व मुक्त कर, मजकडे आपला कान लाव व माझे तारण कर.

३) मला नेहमी थारा सांपडावा म्हणून मजसाठी निवासाचा खडक हो, मला तारण्याचे तू ठरविले आहे, कारण तू माझा गड व दुर्ग आहेस.

४) हे माझ्या देवा, दुर्जनांच्या हातांतून मला मुक्त कर, अन्यायी व निर्दय यांच्या तावडीतून मुक्त कर.

५) कारण, हे प्रभू परमेश्वरा, तू माझे आशास्थान आहेस, माझ्या तरुणपणापासून तू माझे श्रध्दास्थान आहेस.

६) जन्मापासून तू माझा आधार आहेस, मातेच्या उदरातून निघाल्यापासून तू माझा कल्याणकर्ता आहेस, मी तुझी स्तुति निरंतर करीन.

७) बहुतांस मी आश्चर्याचा विषय झालो आहे, तरी तू माझा खंबीर आश्रय आहेस.

८) माझ्या मुखात तुझे स्तुतिस्तोत्र सदा असत जाईल, त्यातून दिवसभर गौरवपर शब्द निघतील.

FOR BELIEVERS, WHEN THEY PRAY !

## विश्वासणाऱ्या करिता, ते प्रार्थना करिताना !

- पास्टर नीको स्मिथ

विश्वासणाऱ्याच्या नात्याने आपल्याला प्रार्थना हा विशेष असा अधिकार आहे. परंतु तो मोठ्या जबाबदारी सहीत देखील येतो. आपण रोग बरे करण्याकरिता जेव्हा वातावरण निर्मिती करितो तेव्हाच या सेवेचे सुलभतेने चालते. सेवा कार्यक्षम किंवा सक्रिय व्हावी असे वाटत असेल तर तीन गोष्टी असावयास हव्यात.

(१) आपला देवावर आणि त्याला हवे ते करण्याच्या त्याच्या कर्तृत्वावर पूर्ण विश्वास असला पाहिजे.

(२) हि सेवा कार्यरत पाहू इच्छिणाऱ्या सर्वांमध्ये ऐक्य असले पाहिजे. एकत्रीतपणे सेवा करीत असताना त्यांच्यात सुसंवाद आणि एकमेंकाविषयी आदर असला पाहिजे. एकजण इतर दोघांकरिता प्रार्थना करतो, त्याचा ऐक्यावर आणि रोग निवारणावर प्रभाव पडतो.

(३) आराधनेची जीवनशैली असली पाहिजे. रविवारची आराधना नाही, तर अशी आराधना जी तुमच्या जीवनातील प्रत्येक भागात पसरते. आपल्या आराधनेद्वारे देवाचा सन्मान केला पाहिजे.

आपल्या मध्ये या तीनही गोष्टी कार्यरत असतील, तर रोगनिवारण, विश्वास आणि प्रार्थना यांचा परिणाम जीवनात देवाच्या मार्गदर्शनाला आणि कार्याला मोकळीक करुन देईल. ७५टक्के लोक ज्यांना आरोग्यदान रोग मुक्ती हवी असते, ती त्यांना छोट्या गटाच्या मध्यस्थिच्या सभांद्वारे मिळते. माझा विश्वास आहे की, या सभांमध्ये खरी पाळकीय आणि काळजी घेणारी सेवा करता येते आणि त्यामुळे कितीही गंभीर प्रकारची गरज असेल ते मदत करु शकतात. येथेच आर्जवून केलेली विनंती आणि दया मुल्यवान ठरतात. जेव्हा व्यक्ति या दानांद्वारे कार्यास तयार होते, तेव्हा त्या व्यक्तिच्या आत्मिक कल्याणाकरिता खरी काळजी-कळकळ असते. ती त्या व्यक्तिला सांत्वनाद्वारे, समाधान करुन, उत्तेजनाद्वारे आणि समुपदेशनाद्वारे देण्यात येते. त्यांना प्रत्यक्षात कळकळा व प्रेम व्यक्त करण्यास ते एकास-एक असा संबंध प्रस्थापित करतात. अनेकदा देव त्यांना काय म्हणत आहे याविषयी त्यांना लक्षात येण्याकरिता मदत करण्यासाठी त्यांचे

(पान ३ वर .....)

१९६९ पासून शिक्षणाद्वारे जिवांना स्पर्श करणारे

# त्याच्या बोलाविण्याचा प्रतिध्वनी

मासिक प्रकाशन - इंग्रजी, तमीळ, मल्यालम, तेलगु, हिन्दी, मराठी, कन्नड, बंगाली, गुजराती, उरीया, नेपाली, आसामी, पंजाबी, उर्दु सिंहाला आणि अफ्रिकन



**"तू आपल्या प्रसादाने वर्ष भूषित करितोस.....".**

(स्तोत्र ६५:११).

प्रभु येशू ख्रिस्तामधील माझ्या अतिप्रिय बंधुनो आणि बहिणींनो,

तुम्हा सर्वांना प्रभु येशू ख्रिस्ताद्वारे शांती आणि कृपा असो !

होय, या ऐतिहासिक महत्व असलेल्या ख्रिस्त जन्मदिनाच्या आणि २०२० या नूतन वर्षाच्या मोसमात एकमेकांना शुभेच्छा देणे ही तुमच्या माझ्याकरिता खरोखर आशीर्वाद आहे. प्रभु येशू ख्रिस्ताने आम्ही या नवीन वर्षात देखील जगावे यासाठी आपले आयुष्य वाढविले आहे. त्यामुळे आपणाला त्याला शोधण्यासाठी, त्याजकरिता जीवन जगण्यासाठी आणि आपल्या जीवनात त्याची इच्छा करण्याचा निर्णायक असा निश्चय केला पाहिजे. एज्रा ८:२२ या देवाच्या वचनात म्हटले आहे - "देवास शरण आलेल्या सर्वांवर त्याचा वरदहस्त असतो." यानुसार प्रत्येक दिवसासाठी त्याची इच्छा जाणून घेण्यास जागृत असले पाहिजे आणि त्याने आम्हांस चालवावे म्हणून पूर्णतया त्याला आपला ताबा द्यावयास हवा, **"तू आपल्या सर्व मार्गात त्याचा आदर कर, म्हणजे तो तुझा मार्गदर्शक होईल."** (नीतीसूत्रे ३:६).

माझ्या बाबतीत म्हणाल, तर दररोज सकाळी मी माझ्या प्रभु व तारणाऱ्या येशू ख्रिस्ताकडे जातो. भरलेल्या अंत:करणाने माझा सर्व नाकर्तेपणा आणि दुर्बलता कबुल करून अशी प्रार्थना करतो, "हे माझ्या प्रभु आणि माझ्या देवा येशू ख्रिस्ता मलाा एक गोष्ट ठाऊक आहे आणि ती म्हणजे तू कोणाला तरी शोधीत आहेस (यिर्मया ३२:१९) जो तुझे मन समजु शकतो आणि तुझी इच्छा करु शकतो. (यशया ६:८) शंभर टक्के. होय, माझ्या प्रभु, हा मी येथे आहे, आज तू माझा उपयोग करुन घे. तुला जे आवडते, ते करण्याची माझी तयारी आहे, तुझी कृपा पुरीव. तुझ्या आज्ञापासून मला दूर जाऊ देवू नकोस. (स्तोत्र ११९:१९). मी अशक्त आहे तेव्हा अमुल्य रक्ताने मला उत्तेजीत कर." आपला **प्रार्थनेचे उत्तर देणारा देव** माझ्या प्रार्थनांना उत्तर देतो आणि माझ्या शारिरीक अशक्तपणात, मानवी आधार, आर्थिक, सामाजिक इत्यादी स्थिती कमकुवत असताना देखील माझ्या सर्व गरजांची काळजी घेतो. "माझी कृपा तुला पुरे आहे" (२ करिंथ १२:९) या त्याच्या अभिवचनानुसार माझ्या दैनंदिन कार्यातील प्रत्येक क्षेत्रात त्याची कृपा मला पुरेशी झाली आहे.

माझ्या प्रिय बंधुनो आणि बहिणींनो, हे सर्वसामर्थी देव येशू ख्रिस्त याचे उत्तेजनपर शब्द तुम्हांला आज आणि भविष्यातील प्रत्येक दिवसांत मदत करतील. तुमच्या जीवनात तुम्ही आश्चर्य कर्मे पाहाल (मीखा ७:१५).

कृपया लक्षात ठेवा, अतिशय कठीण परिस्थितीत आणि परिश्रम करून हे **एको ऑफ हिज कॉलचे** मासिक तुमच्या सारख्या प्रिय जनांकरिता १६ भाषांमध्ये छापून पाठवीत आहोत, अशा अपेक्षेने की, तुमच्या प्रत्येक दिवसाच्या जीवनात तुम्हाला मोठा बदल अनुभवण्यास मिळवा, कारण मासिकात स्वर्गीय संदेश आणि महिन्यातील प्रत्येक दिवसाकरिता प्रार्थनेचे मुद्दे असतात ज्यामुळे तुम्ही **एको ऑफ हिज कॉल** कुटुंबाच्या इतके जवळ असावेत. त्यामुळे मी स्वत: तुम्हा सर्वांकरिता माझ्या सर्व जगातील इतर प्रार्थना भागीदारांसोबत प्रार्थना करण्याची जबाबदारी स्विकारली आहे. तेव्हा खात्री बाळगा कि तुम्ही सर्व समयात प्रार्थनेच्या कवचात आहात. ख्रिस्त येशूने ते आम्हांस दिलेले आहे.

मला आनंद वाटतो की तुम्ही मन लावून आमचे मासिक वाचत आहात. या संबंधातील एक उदाहरण - २०१९ नोव्हेंबर महिन्याच्या तामिळ आवृत्तित २७ तारखेच्या प्रार्थनेच्या मुद्यात छापण्यात




**CHIEF EDITORS**
Pastor S. Sam Selva Raj
Angeline Selvakumari Henry, M.A., M.Ed.

**MANAGING EDITOR**
Pastor Alex Samson Sam, B.Th., M.Div.

**ADMINISTRATION**
Bro. N. Prakasam, M.A., General Manager

**EDITORIAL BOARD**
Sis. Jesy Veena Sam
Bro. M. Paulraj, M.A., B.Ed.
Sis. Serena Bevin, M.A., M. Phil., B.Ed.

**ADVISORY BOARD**
Adv. Jose Abraham
Adv. N. Balaji, B.Com., B.L.
Dr. S. Rabinder Boaz, M.S.
Er. C.G.S. Baburao, B.Tech., M.Tech. (DM)
Aud. K. Puratchivendan, M.Com., B.L.
Bro. Rajeswaran Samuel, B.Com.

**PUBLISHER & PRINTER**
Pastor S. SAM SELVA RAJ
**Echo of His Call Printers**
10, Mohammed Abdullah 2nd Street,
Chepauk, Chennai - 600 005, India.
**Phone :** (+91-44) 2852 8282
2852 9293, 2854 7766
**Email :** sam@echoofhiscall.org
biblecor@yahoo.co.in
**Websites :**
www.echoofhiscall.org
www.echoofhiscall.com

**Our Ministries:** ECHO OF HIS CALL Monthly Magazines (16 languages) BIBLECOR - Postal Courses (3 languages) Theological Correspondence Courses (2 languages) Church Planting Nehemiah Bible Colleges Gospel Printing Press Great Commission Partners Village English High School Crusades 100 Prayer Warriors Community Development

एक चुक झाली होती आणि त्या विनंतीचा नेमका काय अर्थ आहे हे जाणून घेण्यासाठी मला निरनिराळ्या ठीकाणंतून पुष्कळसे दुरध्वनी आले. आम्ही त्या सर्वांचे कौतुक करतो. त्या चुकीबद्दल आम्ही दिलगीरी व्यक्त करतो.

आम्ही आमच्या सर्व गरजांकरिता प्रार्थना करण्याची जबाबदारी स्विकारलेल्या तुमच्या सारख्या **प्रार्थना भागीदारांबद्दल** आभारी आहोत. त्याच प्रमाणे **विश्वासातील भागीदार** जे प्रत्येक महिन्याला प्रार्थना पूर्वक स्वेच्छादान पाठवितात, **आजीव भागीदार** ज्यांनी एकदाच मोठी रक्कम दानाबद्दल दिली, **मासिक वर्गणीदार** जे अनेक दशकांपासून न चुकता त्यांच्या वर्गणीद्वारे सेवेत हातभार लावतात, तसेच महान **सेवेचे भागीदार** जे प्रार्थना करितात आणि देवाचे कार्य करीत आहेत अशा सर्वांचे आभारी आहोत.

**एको ऑफ हिज कॉल**च्या ५१ वर्षांच्या सेवेबद्दल देवाचे आभार मानीत आहोत. या वर्षी देखील मला माझ्या क्षमतेच्या आणि शक्तिच्या पलीकडे जाऊन, देवाच्या सेवेच्या प्रसारार्थ शुभवर्तमान संदेश देण्यास, नेतृत्व करणारे पुढारी तयार करण्यास, मंडळ्या रोपन करण्या आणि भारत, नेपाळ, पाकिस्तान, बांग्लादेश आणि श्रीलंका या देशांतील पददलितापर्यंत सामाजिक कार्य वाढविण्यासाठी देशांत आणि विदेशात प्रवास करावा लागणार आहे. मी देवासमोर आणि तुमच्या समोर नम्र होऊन विनंती करितो की, देशाकरिता असलेले दर्शन आमच्याद्वारे पुर्ण करण्यासाठी पुढील गरजांकरिता प्रार्थना करा.

१) आमच्यावर प्रिती करण्याऱ्या, भरोसा ठेवणाऱ्या, आमच्या करिता प्रार्थना करणाऱ्या आणि आर्थिक पाठबळ पुरविण्याऱ्या सर्वांवर देवाची कृपा असावी.

२) आम्हाला आमच्या दैनंदिन गरजा भागविण्याकरिता नियमितपणे उपलब्ध होत नसल्यामुळे व आम्ही ख्रिस्त येशूवर विश्वास ठेवून सर्व कार्य करित असल्यामुळे आम्हांला आर्थिक बाबतीत देवाच्या मदतीचा हात असावा.

३) आमच्या सहकर्मचाऱ्यांना, मुख्यालयातील, शाखा कार्यालयातील मंडळ्यांतील, सेंट पॉल्स् मॅट्रीक्युलेशन शाळेतील, नहेम्या बायबल कॉलज, बायबलकोर (पत्र व्यवहाराद्वारे शास्त्राभ्यास), थियॉलॉजीकल शास्त्राभ्यासक्रम, मुद्रणालय, सहसंपादक आणि इतर स्टाफ सभासदांना तयार करण्यास आणि सबळ करण्याकरिता देवाचे आधार देणारे हात आमच्या सोबत असावेत. काही विभागात पूर्णावस्था आणण्यामध्ये मी थकून जात असतो.

४) कॉम्प्युटर, वाहन देखभाल, मुद्रणालय, हायस्कूल, बायबल कॉलेज, कार्यालयीन व्यवस्थापन, प्रसार माध्यम सेवा, मिशनरी कार्य, देखरेख करणारे, प्रतिपाळ या सर्व क्षेत्रात मला आणखीन अभिषित्क कार्यकारी, कनिष्ठ कार्यकारी, आत्मिक पुढारी, कुशल कर्मचारी हवे आहेत.

५) माझी पत्नी जेसी वीना सॅम फुफ्फुसाच्या त्रासातून जात असल्यामुळे काही वेळा मी चिंतीत होतो. डॉक्टरांनी २०१८ सालात तिच्या विषयी आशा सोडून दिली होती. तरी देखील देवाने आजपर्यंत तिला माझी मदतनीस म्हणून ठेविली आहे.

६) माझ्या मुलास - पास्टर ॲलेक्स सॅमसन सॅम यास विशेष अशा पाचारणाने, दानांनी आणि आस्थेने देवाच्या सेवेकरिता आशीर्वादीत केले आहे. त्याचा सेमिनरीच्या अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर तो मजबरोबर देवाची सेवा करीत आहे आणि माझ्या पुष्कळशा जबाबदाऱ्या पार पाडीत आहे. त्याला उत्तम प्रकृति स्वास्थाकरिता आणि देवाची सेवा अधिक शक्ति - सामर्थ्याने करण्याकरिता तुमच्या विशेष प्रार्थनेची गरज आहे.

७) माझी मुलगी ॲन्जेलीना सेल्वाकुमारी हेन्री ही आता भारताबाहेर आहे. ती देवाकरिता महान अशा गोष्टी करु शकेल अशा उच्च प्रकाच्या दानांनी - कलांनी भरलेली व्यक्ती आहे. आम्ही प्रार्थना करित आहोत की देवाने तिला सेवेतील तिची जबाबदारी स्विकारण्यासाठी शक्य तितक्या लवकर भारतात परत आणावे.

मी माझ्या सर्व जुन्या मित्रांची आणि पाठींबा देणाऱ्यांच्या २०२० या नुतन वर्षात गोड आठवणी त्यांच्या करिता आणि त्यांच्या कुटुंबियांकरिता प्रार्थना करीत आहे. सरतेशेवटी मी परत एकवार जगभरातील माझ्या सर्व वाचकांस, मित्रांस आणि आधार देणाऱ्यांना निष्फळ न ठरणाऱ्या आणि पवित्र अशा प्रभु आणि तारणाऱ्या येशू ख्रिस्ताच्या नामात शुभेच्छा देत आहे.

ख्रिस्त जन्मदिनांबद्दल उत्तम शुभेच्छा आणि आशीर्वादीत असे २०२०चे नुतन वर्ष जावो.

ख्रिस्त येशूमध्ये तुमचा दास
**एस. सॅम सेल्वा राज.**

---

*(पान १ वरुन .....)*

ऐकून घेणे पुरेसे आहे. तुमच्या सहानुभुतिकारक समजुतदारपणा, तुम्हाला त्यांची काळजी आहे आणि तुमच्या मनात त्यांचे कल्याण करावे असे त्यांना दिसून येईल.

लूक ११:१-१३ "मग असे झाले की तो एका ठीकाणी प्रार्थना करीत होता, आणि ती त्याने समाप्त केल्यावर त्याच्या शिष्यांतील एकाने त्याला म्हटले, प्रभुजी, जसे योहानाने आपल्या शिष्यांस प्रार्थना करावयास शिकविले तसे आपणही आम्हांस शिकवा. तो त्यांस म्हणाला, तुम्ही प्रार्थना कराल तेव्हा असे म्हणा - हे (आमच्या स्वर्गातील) पित्या, तुझे नाम पवित्र मानिले जावो, तुझे राज्य येवो, (जसे स्वर्गात तसे पृथ्वीवरही तुझ्या इच्छेप्रमाणे होवो) आमची प्रतिदिवसाची भाकर प्रतिदिवशी आम्हांस दे, आणि आमच्या पापांची क्षमा कर, कारण आम्ही आपल्या प्रत्येक ऋण्याला क्षमा करितो, आम्हांस परिक्षेत आणू नको, (तर आम्हांला वाईटापासून सोडीत) मग त्याने त्यांस म्हटले, तुम्हांमध्ये असा कोण आहे की त्याला मित्र असून तो त्याजकडे मध्यरात्री जाऊन त्याला म्हणतो, गड्या, मला तीन भाकरी उसन्या दे, कारण माझा एक मित्र प्रवासाहून मजकडे आला आहे आणि त्याला वाढावयास मजजवळ काही नाही, आणि तो आतून उत्तर देईल, मला श्रम देऊ नको, आता दार लाविले आहे हा माझी मुले माझ्याजवळ निजली आहेत, तो त्याचा मित्र आहे यामुळे जरी तो उठून त्याला देणार नाही, तरी त्याच्या आग्रहामुळे जे काही पाहिजे ते उठून त्याला देईल. मी तुम्हांस सांगतो, मागा म्हणजे तुम्हांस दिले जाईल. शोधा म्हणजे तुम्हांस सापडेल, ठोका म्हणजे तुम्हांस उघडले जाईल, कारण जो कोणी मागतो त्याला मिळते, जो शोधितो त्याला सापडते, जो कोणी ठेकितो त्याच्यासाठी उघडले जाते, तुम्हांमध्ये असा कोण बाप आहे की त्याच्याजवळ त्याच्या मुलाने भाकर मागितली असता तो त्याला धोंडा देईल ? अगर मासा मागितला असता मासा न देता त्याला साप देईल?

किंवा अंडे मागितले असता त्याला विंचू देईल? तर तुम्ही वाईट असता तुम्हाला आपल्या मुलांना चांगल्या देणग्या द्यावयाचे कळते, तर मग स्वर्गीय पित्याजवळ जे मागतात त्यांस तो किती विशेषकरुन पवित्र आत्मा देईल ?"

शिष्यांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना येशूने आपण प्रार्थनेत किती धीट आणि आग्रही असणे महत्वाचे असते याकडे लक्ष वेधले. त्याच दाखल्यात येशूने देव प्रार्थनेचे उत्तर देतो हे देखील निर्देशनात आणले त्याकाळात यहूदी लोकांत पाहूण्याची काळजी घेण्यास नकार देण्याचा कोणालाही अधिकार नव्हता. ती त्यांची संस्कृती होती. जरी तो मनुष्य पांघरूण अंथरूण झोपलेला होता आणि रात्रभरासाठी दार बंद केले होते, तरी देखील शेजाऱ्याला मदत करण्याची जबाबादारी त्याजवर होती. कारण गावाची प्रतिष्ठा धोक्यात होती. जरी तो मनुष्य दारात सतत उभा होता, आपल्याला मदत मिळणार हे त्याला ठाऊक होते. येशू आपल्याला तेच सांगत आहे. काही वेळा परत-परत प्रार्थना केली पाहिजे, कारण आपला करार आणि देवाच्या अभिवचनांवरुन आपल्याला ठाऊक आहे की, देव उत्तर देणार आणि आपणाला इजा किंवा दुखापत होणार नाही अशी प्रत्येक चांगली आणि योग्य अशी गोष्ट देणार.

**विश्वासाची प्रार्थना :**

मार्क ११:२३-२५ "**मी तुम्हांस खचीत सांगतो, जो कोणी या डोंगराला, तू उपटून समुद्रात टाकिला जा, असे म्हणेल, आणि आपल्या अंत:करणात संशय न धरिता, आपण म्हणतो ते घडेल असा विश्वास धरील, त्याचे ते घडून येईल. यास्तव मी तुम्हांस सांगतो, जे काही तुम्ही प्रार्थना करुन मागाल ते तुम्हांला मिळालेच आहे असा विश्वास धरा, आणि ते तुम्हांस प्राप्त होईल. आणखी तुम्ही उभे राहून प्रार्थना करिता तेव्हा तुमच्या मनात कोणाविषयी काही असेल तर त्याची क्षमा करा, हे यासाठी की तुमच्या स्वर्गातील पित्याने तुमच्या अपराधांची क्षमा करावी.**"

हे जेव्हा आम्ही व्यक्ती बरे होण्याकरिता प्रार्थना करतो, मग त्याच्या आजारामागचे कोणतेही कारण असू द्या. उपास करुन प्रार्थना करणे चांगले आहे. आपण निश्चितार्थाने आणि आग्रहाने प्रार्थना करतो, त्याचा अर्थ ती देवाची वेळ आहे किंवा ती त्याच्या इच्छेनुसार आहे असा होत नाही. आपण प्रार्थना करुन योग्य रितीने बायबल वाचले, तर आपल्याला देवाची इच्छा कळू शकते, परंतु वेळ ही देवाचीच असते. आपण प्रार्थना करणे थांबवू शकत नाही, कारण आपल्याला देवाची इच्छा शोधण्यास आणि प्रकट करण्याकरिता तेथे पवित्र आत्मा आहे. आपण विश्वास ठेवणे थांबवू शकत नाही आणि देवाला सोडू शकत नाही.

प्रे. कृ. २८:८ "**तेव्हा असे झाले की पुब्ल्याचा बाप तापाने व आंवरक्ताने दुखणाईत पडला होता, त्याजकडे आंत जाऊन पौलाने प्रार्थना केली व त्याजवर हात ठेवून त्याला बरे केले.**"

पौल मिलिता नावाच्या बेटावर होता. पुब्ल्याचे वडील आजारी होते आणि त्यांना बरे करावयाचे होते. वचन स्पष्ट रितीने दाखविते कि मनुष्यावर हात ठेवण्या अगोदर त्याला बरे करण्याकरिता प्रथम प्रार्थना करण्याची गरज आहे. आजाऱ्यांनी भेट घेण्यास जात असताना आपण बहुतेकदा हीच चुक करीत असतो. आपण आकलन शक्ति, ज्ञान, कळवळा आणि सुचना यासाठी प्रार्थना करीत नाही. आपण सुरुवातीस प्रार्थना करितो. तेव्हा देव आम्हांस तो त्याचे बरे


## एको ऑफ हिज कॉल

**(पत्रव्यवहारद्वारा अभ्यासक्रम)**

**बायबल कोर**

आम्ही पवित्र शास्त्रातील मुलभूत सत्यांवर आधारीत शास्त्राभ्यास देतो. अभ्यासक्रमासाठी **न्यु लाईफ फॉर यू** नावाचे पुस्तक तुम्हाला पुरविण्यात येईल. अभ्यास क्रम पूर्ण केल्यानंतर तुम्हाला एक प्रशस्तीपत्र देण्यात येईल. यासाठी कोणत्याही प्रकारची सक्तीची फी आकारली जात नाही.

**पत्रव्यवहाराद्वारे थियॉलॉजी अभ्यासक्रम**

आता पत्रव्यवहाराद्वारे थियॉलॉजी अभ्यासक्रम ॲडव्हान्स स्वरुपात पास्टर आणि ख्रिस्ती पुढारी सुध्दा या अभ्यासक्रमाचा लाभ घेऊ शकतात. कोर्सची फी १००० रु. आकारली जाईल. १४२ प्रकरणे असलेली ७ पुस्तके यात समाविष्ट आहेत. यशस्वी विद्यार्थ्यांना पदवी देण्यात येईल.

अधिक माहिती करिता कृपया लिहा :

**The Chairman, Nehemiah Bible College, Echo of His Call,**
**10, Mohammed Abdullah 2nd Street, Opp. Cricket Stadium,**
**Chepauk, Chennai - 600 005. INDIA.**
**Tel.: (044) 2852 8282 / 2852 9293 / 28547766 Call : (+91)98410 71852**
**95661 31858 E-mail : biblecor@yahoo.co.in**


**The details of our Bank Accounts are given below. Please inform us the details of your remittances.**

| Bank | Branch | Name | IFSC Code No. | Account Number |
|---|---|---|---|---|
| 1. STATE BANK OF INDIA | Triplicane, Chennai -5 | S. Sam Selva Raj | SBIN 0000249 | 102329 34679 |
| 2. ICICI BANK | Anna Salai, Chennai -2 | Echo of His Call | ICIC 0006038 | 6038 05022319 |

# महान सेवाकार्याचे भागीदार

# प्रार्थना विनंत्या

ओझी वाहणे (गलती ६:२),
गरजा भागविणे (रोम १२:१३),
आणि कार्यास गती देणे (२ तिमथी १:६)

**१९ जानेवारी २०२० ते १८ फेब्रुवारी २०२०**

**(कृपया हे पान बाजूला काढून, सतत प्रार्थना करण्याकरिता तुमच्या पवित्र शास्त्रात ठेवा)**

## देव कार्यरत आहे !

### स्तुति करीता मुद्दे

- **१९ जानेवारी** : देवाने आमची संपूर्ण रात्रभराची नूतन वर्षाची उपासना आशीर्वादीत केली.
- **२० जानेवारी** : देव जागतीक संजीवनाकरिता **१०० प्रार्थना योध्यांची** प्रार्थनेची सेवा आशीर्वादीत करीत आहे.
- **२१ जानेवारी** : आमच्या सर्व मिशन क्षेत्रांतून आम्हाला चांगले अहवाल प्राप्त होत आहेत.
- **२२ जानेवारी** : आमची बहुतेक थकीत बिले चुकती करण्यास देवाने मदत केली.
- **२३ जानेवारी** : **सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन शाळेच्या** सर्व शिक्षकांबद्दल देवाची स्तुती करु या.
- **२४ जानेवारी** : आमच्या मुद्रणालयात १६ भाषांमध्ये छापून सर्व मिशन क्षेत्राना वितरीत करण्यात आलेले शुभवर्तमान साहित्य देवाने आशीर्वादीत केले.
- **२५ जानेवारी** : बायबलकोर आणि थियॉलॉजीकल - दोन्ही पत्रव्यवहाराद्वारे करण्यात येत असलेले अभ्यासक्रमाबद्दल देवाची स्तुति करु या.
- **२६ जानेवारी** : आमचे सर्व सह-संपादक आणि त्यांचे कुटुंबिय यांच्या करिता देवाची स्तुति करु या.
- **२७ जानेवारी** : नहेम्या बायबल कॉलेजच्या व्याख्यान्यांकरिता देवाची स्तुति करु या.
- **२८ जानेवारी** : आमचे प्रार्थना भागीदार, विश्वासातील भागीदार, आजीव भागीदार, वर्गणीदार, महान सेवा कार्यातील भागीदार या सर्वांकरिता देवाची स्तुति करु या.
- **२९ जानेवारी** : नहेम्या बायबल कॉलेजचे सर्व कार्यक्रम देवाने आशीर्वादीत केले.
- **३० जानेवारी** : आमच्या मिशन क्षेत्रांना दिलेल्या भेटी देवाने आशीर्वादीत केल्या.
- **३१ जानेवारी** : आमचे सर्व राज्य समन्वयकांकरिता देवाची स्तुति करु या.
- **०१ फेब्रुवारी** : मागील महिन्यातील **एको ऑफ हिज कॉलचे** सर्व कार्यक्रम देवाने आशीर्वादीत केले.
- **०२ फेब्रुवारी** : देव आमचे वरिष्ठ पाळक पास्टर सॅम सेल्वाराज आणि त्यांच्या कुटुंबियांचे सर्व दुष्ट शक्तिंपासून रक्षण करीत आहे.
- **०३ फेब्रुवारी** : मागील महिन्यात प्रभु परमेश्वर मंडळीत नवीन आत्मे घेऊन आला.

### प्रार्थने करीता मुद्दे

- **०४ फेब्रुवारी** : देवाने २०२०या वर्षातील **एको ऑफ हिज कॉल** सेवा कार्यासाठी आवश्यक तो निधी पुरवावा.
- **०५ फेब्रुवारी** : आमच्या मिशन क्षेत्रांना २०१९ सालात ज्या मित्रांनी भेटी दिल्या त्यांना देवाने आशीर्वादीत करावे.
- **०६ फेब्रुवारी** : या नुतन वर्षात देवाने तुम्हा सर्वांना विपुल आशीर्वाद द्यावेत.
- **०७ फेब्रुवारी** : मादक पदार्थाच्या सेवनांच्या बंधनातून लोकांची सुटका व्हावी.
- **०८ फेब्रुवारी** : सर्व पंथीय मंडळ्या एकमेकांशी प्रिती रज्जुंनी बांधला जाव्यात.
- **०९ फेब्रुवारी** : **एको ऑफ हिज कॉल**सेवाकार्या करिता प्रार्थना करणाऱ्या सर्वांकरिता आज प्रार्थना करु या.
- **१० फेब्रुवारी** : रात्रीच्या समयी मुर्ती पुजेच्या वेळी होणाऱ्या मोठ्या आवाजास आळा बसावा.
- **११ फेब्रुवारी** : उत्तर प्रदेशांतील मिशनाऱ्यांच्या रक्षणा करिता आणि देवाच्या मार्गदर्शना करिता प्रार्थना करु या.
- **१२ फेब्रुवारी** : २०२०-२०२१ या वर्षाकरिता **नहेम्या बायबल कॉलेज** करिता देवाने विद्यार्थी पुरवावेत.
- **१३ फेब्रुवारी** : आमच्या शुभवर्तमान साहित्य मुद्रणालया करिता देवाच्या मार्गदर्शनाची गरज आहे.
- **१४ फेब्रुवारी** : जगभरातील सर्व राजकीय पक्ष आणि त्यांचे पुढारी यांच्या करिता विशेष प्रार्थना करु या.
- **१५ फेब्रुवारी** : जागतिक शांततेकरिता प्रार्थना करु या.
- **१६ फेब्रुवारी** : मंडळ्या, प्रकाशन, शाळा, बायबल कॉलेज, मुद्रणालय आणि व्यवस्थापन यांत काम करणाऱ्या सर्व सहकाऱ्यांसाठी प्रार्थना करु या.
- **१७ फेब्रुवारी** : नेपाळ, पाकिस्तान, बांगलादेश, श्रीलंका या देशांतर्गत असलेल्या समस्यांकरिता प्रार्थना करु या.
- **१८ फेब्रुवारी** : देवाने आमचे वरिष्ठ पाळक पास्टर सॅम सेल्वाराज आणि त्यांच्या कुटुंबाचे सर्व दुष्ट शक्तिपांसून रक्षण करीत रहावे.

## महान सेवा कार्य भागीदारांची - कार्य केंद्रे

● **केरळ**-त्रिवेंद्रम, कोट्याम, थीरूवेल्ला, एर्नाकुलम ● **तामिळनाडू**-त्रिची, कोईम्बतूर, मदुराई, नागरकोईल, असारी पाल्लम, सेलम ● **पंजाब**-लुधीयाना ● **मध्यप्रदेश**-भोपाळ ● **जम्मू-काश्मीर**-उधामणूर ● **उत्तर प्रदेश**-लखनऊ ● **गुजराथ**-अहमदाबाद ● **बिहार**-झारखंड ● **पश्चिमबंगाल**-कोलकत्ता ● **नागालॅण्ड ओरिसा**-नयागड ● **आंध्रप्रदेश**-विशाखापट्टनम ● **महाराष्ट्र**-मुंबई ● **पॉण्डेचरी** ● **पाकिस्तान** ● **श्रीलंका** ● **बांगलादेश** ● **नेपाळ**

करण्याचे सामर्थ्य कसे कार्य करणार या संबंधाची सुचना देवू शकतो. तेव्हा त्यानंतर त्या आश्वासनाने, पौला प्रमाणे, देवाने सुचविल्यानुसार त्या व्यक्तिच्या डोक्यावर हात ठेवू शकतो.

१ योहान ५:१४-१५ **“त्याविषयी आपल्याला जो भरवसा आहे तो हा आहे की आपण त्याच्या इच्छेप्रमाणे काही मागितले तर तो आपले ऐकेल, आपण मागतो त्याविषयी तो आपले ऐकतो, हे आपल्याला ठाऊक आहे, म्हणून जी मागणी आपण त्याच्याजवळ मागितली आहेत ती आपल्याला मिळाली आहेत हेही आपल्याला ठाऊक आहे.”**

त्याच्या इच्छेनुसार पुर्ण होते तेव्हा देवाचे सामर्थ्य आपल्यावर सोडण्यात येते. येशू आपले उदाहरण होता. तो देव होता आणि निश्चितार्थाने त्याला जे वाटते, ते करण्याचा त्याला अधिकार होता. परंतु आपण वाचतो की, जे काही तो करीत असे ते करण्या अगोदर त्याला त्याच्या पित्याची इच्छा जाणून घेण्याची गरज असे. आपण देखील पित्याची इच्छा जाणून घेतली तर आपण जशी प्रार्थना करावी तशी ती करण्यास समजेल. अशा प्रकारे आपण आपल्या प्रार्थनांची उत्तरे प्राप्त करुन घेतो. देवाची इच्छा आपल्याला कळते आणि आपण तिला शरण येतो, तेव्हा आपण आपल्या इच्छेनुसार नाही तर त्याच्या इच्छेनुसार प्रार्थना करतो.

रोम ८:२६-२७ **“तसेच आत्माही आपल्या अशक्तपणात आपल्याला हातभार लावितो, प्रार्थना करावी तशी करावयास आपल्याला समजत नाही, पण आत्मा स्वत: अनिर्वाच्य उच्छश्वांसानी आपल्यासाठी विनंती करितो, आणि अंतर्यामे पारखणाऱ्याला त्या आत्म्याचा मनोभाव काय हे ठाऊक आहे, कारण हा आत्मा पवित्र जनांसाठी देवाच्या मर्जीप्रमाणे विनंती करितो.”**

योहान १६:१३-१५ **“तरी तो सत्याचा आत्मा येईल तेव्हा तो तुम्हांस मार्ग दाखवून सर्व सत्यात नेईल, कारण तो आपल्या स्वत:चे सांगणार नाही, तर जे काही ऐकेल, तेच सांगेल, आणि होणाऱ्या गोष्टी तुम्हांस विदित करील. तो माझे गौरव करील, कारण जे माझे आहे त्यातून घेऊन ते तुम्हांस विदित करील. जे काही पित्याचे आहे ते सर्व माझे आहे, म्हणून मी म्हणालो की जे माझे आहे त्यांतून घेऊन ते तुम्हांस विदित करील.”**

प्रार्थनेस करण्यास सुरुवात करण्या अगोदर आपल्याला देवाची इच्छा कळविण्यासाठी पवित्र आत्म्यास आमंत्रण दिले पाहिजे तो ते प्रत्यक्षात आपल्या अंत:करणात घालून करील. (प्रे.कृ. ११:१२), आपल्याला उधीष्टदेऊन (प्रे.कृ. १०:९-१८), किंवा ऐकू येईल अशा आवाजात बोलून (प्रे.कृ. ९:४-५), किंवा स्वप्नाद्वारे (मत्तय १:२०-२१), किंवा आत्म्याचे ओझे देऊन (रोम ८:२६), किंवा भविष्यवाणी द्वारे (१ करिंथ १४:३), किंवा दुसऱ्या कोणाच्या द्वारे निश्चितपणा व्यक्त करून (प्रे.कृ. १५:२८ किंवा देवाच्या वचनाकडे आपल्याला निर्देशीत करुन (२ तिमयी ३:१५-१६) पर्यंत आपण देवाच्या आत्म्या सोबत कार्य करतो. ते कशाप्रकारे पवित्र आत्म्याच्या सहकाऱ्याने आम्ही जेव्हा प्रार्थना करतो त्या प्रार्थनेला मोठे सामर्थ्य प्राप्त होते.

देव जर व्यक्तिच्या जीवनात अधिक पवित्रता आणि विश्वासूपणा त्याच्या इच्छेनुसार आणू इच्छितो, आणि जर तो ते आजारद्वारे किंवा क्लेश - दु:ख याद्वारे करु इच्छित असेल तर, त्या व्यक्तिला शरिरात पूर्ण आरोग्य प्राप्त होण्यासाठी प्रार्थना करावी, त्याची आरोग्य प्राप्ति अजूनही देवाच्या हातात आहे. पवित्र शास्त्रात आम्हांस सुचित करण्यात आले आहे की, योग्य असणाऱ्या प्रत्येक गरजांकरिता आपण प्रार्थना करावी. देव प्रार्थनेचे इतर देण्यास समर्थ आहे आणि तो त्या व्यक्तिला त्या समयी बरे करणार नाही किंवा कधीही करणार नाही हे देखील प्रकट करण्यास समर्थ आहे. देव जर ती गरज वाटते आणि ती त्याच्या योजने अंतर्गत असते तेव्हा तो बरे करतो.


## जागा भरावयाच्या आहेत

**एको ऑफ हिज कॉल मासिक इंग्रजी, तामीळ, मल्यालम, तेलगु, हिन्दी, कन्नड, मराठी, आसामी, बंगाली उर्दु, गुजराथी, नेपाळी, उडीया, पंजाबी, सिंहली आणि आफ्रिकन भाषेत प्रसिध्द केले जाते. पुढील जागा भरावयाच्या आहेत -**

१. प्रशासकीय कार्यवाहक (Executives)
२. लेखक (आत्मिक संदेश व लेख)
३. मंडळ्यांमध्ये अनुपाद करणारे (सर्व भारतीय भाषांमध्ये)
४. भारतीय भाषांमध्ये पुस्तकांचे भाषांतर करणारे
५. मुख्यालयाकरिता सह-संपादक
६. मुद्राणालय कारागीर
७. वाहन चालक
८. शिक्षक (शाळे करिता)
९. शाळे करिता सहाय्यक प्रिन्सिपल
१०. बायबल कॉलेजसाठी व्याख्याते
११. कार्यालयीन स्टाफ - संगणकाची, टाईपींगची आणि डी.टी.पी.ची माहिती असणारे.

आम्हाला या सर्व जागांकरिता अतिशय समर्पित अशा व्यक्ति हव्या आहेत आणि चांगले वेतन देवू. कृपया तुमची माहिती आमच्या कार्यालयास पोस्टाद्वारे किंवा sam@echoofhiscall.org या ई-मेल वर किंवा +91 9841071858 या वॉटस् ॲप क्रमांकावर अपेक्षीत वेतनासहित पाठवावी.

**एस. सॅम सेल्वा राज**
**संपादक आणि प्रकाशक**
**एको ऑफ हिज कॉल**

तर मग योग्य गरज कोणती ? आपला असा विश्वास असला पाहिजे कि देव आपला स्वर्गीय पिता आहे, आणि तो आपल्यासाठी आणि आपल्या भल्यासाठी जे काही चांगले आहे ते सर्व तो देण्याचे थांबवणार नाही. माझी लेकरे जेव्हा मजकडे त्यांच्या गरजा आणि इच्छा घेऊन मजकडे येतात, तेव्हा मला त्यामध्ये निकडीची गरज आणि महत्व दिसून येत नाही. त्यामुळे मी काही वाईट पिता ठरत नाही, आणि त्यांच्याकरिता काय चांगले आहे. भविष्यात त्यांच्या करिता काय अपयाकारक ठरणार आहे हे त्यांच्या पेक्षा अधिक चांगले मला ठाऊक आहे. त्यांना त्यांच्या विनंती नुसार देण्याचा निर्णय हा केवळ त्यांना कोणती गोष्ट दिल्याने आनंद होईल. यावर आधारित नसणार, तर त्यांना वाढण्याकरिता आणि चुकीच्या मार्गातून दूर राहण्याकरिता कोणती गोष्ट उपयुक्त ठरणार यावर असेल. आपण पुष्कळदा अशी भावना व्यक्त करित असतो - "तुला वाईट वाटते त्यापेक्षा मला अधिक वाईट वाटते !" कारण काही वेळा आमचे लेकरे रडतील आणि काही वेळा ते दुखावले जातील, परंतु त्यांना आपण वाढू द्यावे.

स्तोत्र ८४:११ **"कारण परमेश्वर देव सूर्य व ढाल आहे. परमेश्वर अनुग्रह व गौरव देतो, जे सात्विकपणे चालतात त्यांस उत्तम ते दिल्यावांचून तो राहणार नाही."**

जर आरोग्यदान हे देवाच्या दृष्टिने आपल्या करिता चांगले आहे तर तो ते त्याच्या प्रिय लेकरांना देण्याकरिता रोखून ठेवणार नाही. प्रार्थना करीत असताना आपण हे स्विकारले पाहिजे की देव आमच्यावर प्रेम करतो, त्याला आमची काळजी आहे आणि तो आपल्याला उत्तम ते देऊ इच्छितो. देव आरोग्य दाता व्याधी मुक्त करणारा आहे आणि त्याने ती व्याधी मुक्त करण्याची सेवा बंद केलेली नाही.

फिलिप्पै ४:६-७ **"कशाचीही काळजी करु नका तर सर्व गोष्टी विषयी प्रार्थना व विनंती करून आभार प्रदर्शनासह आपली मागणी देवाला कळवा, म्हणजे सर्व बुध्दिसामर्थ्याच्या पलीकडे असलेली देवाची शांती तुमची अंत:करण व तुमचे विचार ख्रिस्त येशूमध्ये राखील."**

मत्तय २१:२२ **"तुम्ही विश्वास धरून प्रार्थनेत जे काही मागाल ते सर्व तुम्हांस मिळेल."** आपण प्रार्थना करित असताना प्रार्थनेत मागितलेले सर्व आपणांस मिळाले आहे. असा विश्वास धरला पाहिजे. आम्ही जे काही मागतो, ते आपल्याला प्राप्त होण्या अगोदरच त्यावर हक्क प्रस्थापित केला पाहिजे. बरे झाल्याचा पुरावा आणि परिणाम कदाचित दिसणार नाही. परंतु ते घडलेले आहे अशी भूमिका घेतली पाहिजे आणि विश्वास ठेवला पाहिजे. प्रार्थना करुन विश्वास ठेवतो त्याच क्षणाला आपल्याला आरोग्य दान प्राप्त होते, काही प्रकरणांमध्ये कदाचित वेळ लागेल, परंतु देवाने केले नाही असा त्याचा अर्थ होत नाही. काही वेळा अशा प्रार्थनेनंतर जी लक्षणे दिसू लागतात ती आपल्या मनात आणि हृदयात शंका निर्माण करण्यासाठी तो सैतानाचा प्रयत्न असतो. अशा प्रसंगी तुम्ही देवाकडे धाव घ्या आणि त्याजवर विश्वास ठेवा कारण इब्री ११:६ या वचनात म्हटले आहे. "त्याजकडे धाव घेणाऱ्याला तो प्रतिफळ देणारा होतो."

अनेकजण आरोग्य प्राप्त करुन घेण्यात अपयशी ठरले. कारण त्यांना विश्वासाची प्रार्थना केल्यानंतर लगेचच परिणाम दिसून आला नाही आणि त्यांनी कशा रितीने बरे व्हावे आणि त्याने त्यांना कशा प्रकारे आशीर्वाद द्यावा याविषयी सुचना दिल्या. या प्रार्थनेत उत्तर मिळण्याकरिता महत्वाची गोष्ट म्हणजे, देवाने प्रार्थना ऐकली आहे आणि त्याने केलेल्या करारनुसार उत्तर देण्यास तो बांधील आहे. देव प्रार्थनेचे उत्तर हळूहळू किंवा तात्काळ देईल, परंतु उत्तर निश्चितच देणार.

योहान १६:२३-२४, **"त्या दिवशी तुम्ही माझ्याजवळ काही मागणार नाही . मी तुम्हांस खचीत सांगतो की तुम्ही पित्याजवळ काही मागाल ते तो तुम्हांस माझ्या नांवाने देईल. तुम्ही अजून माझ्या नावाने काही मागितले नाही, मागा म्हणजे तुम्हांस मिळेल, यासाठी की तुमचा आनंद परिपूर्ण व्हावा."**

येशु आपल्या बद्दल आणि आजच्या बद्दल बोलत होता. आपण देवाची लेकरे या नात्याने पित्याला येशु ख्रिस्ताच्या नामात सरळ प्रार्थना करु शकतो. येशु कॅलवरिकडे जाण्याअगोदर हे बोलला होता. त्या समयापर्यंत येशुला प्रार्थना करण्यात येत नव्हती, तर ती अब्राहम, इसहाक आणि याकोब यांच्या देवाला करण्यात येत होती. आपल्याला पित्याला येशुच्या नामाने प्रार्थना करिता यावी याकरिता जे आवश्यक होते ते सर्व येशुने पूर्ण केले. पुढे त्या वचनात कारण देताना म्हटले आहे की आपला आनंद पुर्ण व्हावा यासाठी येशुला आपल्या आनंदात रस आहे.

याकोब ५:१३-१५ **"तुम्हापैकी कोणी दु:ख भोगीत आहे काय ? त्याने प्रार्थना करावी. कोणी आनंदित आहे काय ? त्याने स्तोत्रे गावी. तुम्हापैकी कोणी दुखणाईत आहे काय ? त्याने मंडळीच्या वडिलांना बोलवावे, आणि त्यांनी प्रभूच्या नामाने त्याला तेल लावावे व त्याजवर ओणवून प्रार्थना करावी, विश्वासाची प्रार्थना दुखणादूतास वाचवील, प्रभु त्याला उठवील, आणि त्याने पापे केली असली जरी त्याला क्षमा होईल."**

आपण या शास्त्रभागावर मंडळीतील

## बातमी

### "ताशी एक हुंडा बळी"

५० वर्षांपासून विवाहात हुंडा मागणे हा गुन्हा आहे असा कायदा अस्थित्वात असताना देखील भारतात जवळ-जवळ तासाला एक (किंवा प्रति वर्षी ८०००) अशा प्रमाणात स्त्रीचा हुंडा बळीचा गुन्हा घडत आहे. हा आकडा कदाचित दुप्पट असू शकेल, कारण अपघातात मृत्यु किंवा आत्महत्या म्हणून हजारो प्रकरणे नोंदविली जात आहेत. - Stopvaw.org.

- (फोररनर सप्टेंबर २०१९)

येथे लक्षात घेतले पाहिजे की तो शास्त्रभाग विश्वासाच्या प्रार्थनेबाबत देखील बोलत आहे. हि प्रार्थना दैवी विश्वासाच्या सहभागाने केलेली प्रार्थना आहे. या प्रार्थनेचा विचार करतो तेव्हा आपल्याला कळते की ती विश्वासाने केलेल्या प्रार्थने पेक्षा अधिक आहे की विशेष प्रार्थना आहे. ज्या मध्ये देव आम्हाला बरे करण्याकरिता विश्वास देते. ती देवाने प्रेरित केलेली प्रार्थना आहे. ज्यांना प्रार्थनेकरिता बोलाविले ते काही वेळा आरोग्यासाठी प्रार्थना करण्यासाठी इतके प्रेरित होतात की जर ती देवाची इच्छा असेल तर ते तात्काळ बरे होतात.

मत्तय १८:१९-२० **"आणखी तुम्हांस सांगतो, पृथ्वीवर तुमच्यातील दोघे कोणाएका गोष्टीविषयी एकचित्त होऊन विनंती करितील तर ती माझ्या स्वर्गातील पित्याकडून त्यासाठी केली जाईल. कारण जेथे दोघे किंवा तिघे माझ्या नामाने जमले आहेत तेथे त्याजमध्ये मी आहे."**

हि दोनही वचनाचे एकत्रीतपणे लागूकरण केले पाहिजेत. वचन सांगत आहे. पृथ्वीवर कोठे तुम्ही आहात. वचन केवळ मंडळीच्या सभेचा संदर्भ देत नाही आपण त्याच्या नामाने प्रार्थना करु तेव्हा येशू प्रार्थनेची परिपुर्ती करण्याकरिता तेथे हजर राहाण्याची खात्री देत आहे. येशू तेथे उपस्थित राहाणार हे अद्भूत बाब आहे, परंतु कार्य करण्याकरिता केवळ दोघांचे एकत्रित होणे हे देखील उत्तम आहे. व्यक्तिच्या बरे होण्यासाठी - व्याधिमुक्तते साठी संपूर्ण मंडळीला प्रार्थनेकरिता एकत्र करणे उत्तम आहे. परंतु कार्यसिध्दी साठी वचनाप्रमाणे केवळ दोघे एकत्रित येण्याची गरज आहे. वचनातील मुख्य शब्द "एकचित्त" हा आहे. आपल्याला विश्वास आणि आशा या मधील फरक देखील कळणे गरजेचे आहे. तुम्ही एकाद्या गोष्टी बद्दल सहमती दर्शविण्यासाठी विश्वासाची गरज असते. आशा ते करणार नाही. येशू तेथे असेल तुम्ही अशी आशी कराल आणि आशा बाळगाल की ती तुम्ही जे मागितले ते तुम्हांस मिळेल तर तसे घडणार नाही तेथे विश्वास असण्याची गरज आहे.

आपण एखाद्या व्यक्तिला "तुला विश्वास हां जबरदस्ती करु शकत नाही. ती निवड असावी लागते. अविश्वासणाऱ्याशी बोलत असताना आपण त्याला "त्याच्या बसलेल्या फटक्यांनी आपणांस आरोग्य प्राप्त झाले आहे" हे सांगितले तर त्याला त्याचा अर्थ समजणार नाही. पवित्र आत्म्याचे प्रकटीकरण त्यांना समजले आणि त्यांनी ते पाहिले असेल, तर तुम्ही त्यांना तसे सांगू शकता. तसे नसेल तर "तुम्ही विश्वास ठेवाल तर तुम्हाला ते प्राप्त होईल" असे म्हणणे शहाणपणाचे ठरेल. त्यांचा जर असे बोलण्यात विश्वास असेल तर काही प्रमाणात विश्वास कार्यरत होतो आणि देवाला त्याचे कार्य करण्यास मार्ग तयार होतो. नाही तर डॉक्टर त्यांना सांगे पर्यंत औषधोपचारावर राहू द्या.


**Echo of His Call Advertisment Rates**

| Size | One Language Only | In All 16 Languages |
|---|---|---|
| Quarter Page | Rs. 2,000 | Rs. 30,000 |
| Half Page | Rs. 3,500 | Rs. 50,000 |
| Full Page | Rs. 5,000 | Rs. 70,000 |

**NEHEMIAH BIBLE COLLEGES, CHENNAI, INDIA**

**ECHO OF HIS CALL MINISTRIES** (ESTD.: 1969)

**Affiliated to Hindustan Bible Institute & College (HBI), Chennai**

**&**

**Recognised by the International Christian Leaders & Senior Pastors for the 50 Years! Hundreds of candidates benefitted!!**

**RESIDENTIAL COLLEGE, Velachery**
**(Medium: English & Hindi)**
Course : Diploma in Theology,
Qualification : 10th Standard
Period : One year (with field and administrative trainings)

Golden Opportunity!

Don't miss!!

God is Calling you!!!

**EVENING COLLEGE, Chepauk**
**(Medium : Tamil)**
Course : Diploma in Theology
*Monday, Tuesday & Thursday 6.30 PM to 8.30 PM*
(Evening Classes - Chepauk)
Qualification : 10th Standard
Period : One year (with Special Seminars on holidays)

**Pastor S. Sam Selva Raj, Founder-President**

**For more details & application forms please contact :**

NEHEMIAH BIBLE COLLEGES

10, Mohammed Abdullah 2nd Street, Bells Road, Opp. Cricket Stadium, Chepauk, Chennai - 600 005, India.

**Phone : (+91-44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766, Cell No : (+91) 98410 71852, 95661 31858**

**E.mail : sam@echoofhiscall.org / biblecor@yahoo.co.in Websites : www.echoofhiscall.org / www.echoofhiscall.com**



# PIT TO PALACE
# खड्ड्यातून महालापर्यंतची मालिका

**(रेव्ह. सॅम सेल्वा राज यांच्या जीवनांतील अनुभव)**

**"वाचणाऱ्याने हे ध्यानात आणावे" (मत्तय २४:१५)**

## तुमच्या पालकांचा विचार करा

माझे वडील संरक्षण दलात सेवेत असल्यामुळे माझ्या आजी-आजोबाने आणि विस्तारीत कुटुंबाने माझे संगोपन केले. मला एक चांगला ख्रिस्ती म्हणून वाढविण्यावर आणि आत्मिक गोष्टी शिकविण्यावर त्यांचा कटाक्ष होता) मजमध्ये देवाविषयीची प्रिती उत्पन्न व्हावी या उद्देशाने ते मला उपासनेला, लहान लेकरांच्या शब्बाथ शाळेला आणि इतर आत्मिक सभांना घेऊन जात असत.

आमच्या कुटुंबात सर्व प्रथम देवाच्या प्रितीचा स्विकार करणारे, माजे आजोबा होते.त्यांचे पूर्वीचे नाव एम. नारायणन असे होते, आणि ख्रिस्ताकडे आल्यावर त्यांचे नाव बदलून नथानिएल ठेवण्यात आले. ते श्रीमंत होते, त्यांच्याकडे पुष्कळशी मालमत्ता होती. मी किशोर वयात असताना ते मला शाळेला, विशेष शिकवणी वर्गांना, उपासना, शब्बाथ शाळेला घेऊन जात आणि परत घरी घेऊन येत असत. त्या काळात वाहतुकीची साधने उपलब्ध नसल्यामुळे मी चालताना थकल्यावर ते मला त्यांच्या खांद्यावर उचलून घेऊन चालत असत. रस्ताने चालत असताना वाटेत भेटणाऱ्या लोकांना ते सांगत असत, "मी छोट्या येशूला खांद्यावर घेतलेले आहे !"

त्यांचे माझ्यावर खुप प्रेम होते. भाताच्या शेतात ते मला कापणी करणे, बैलांची आणि बैल गाडीची काळजी घेणे, भात शेती लागणाऱ्या गोष्टींची खरेदी करणे आणि शेतामध्ये पिकलेल्या धान्याची विक्री करणे, पोहणे असे विविध प्रकारचे खडतर प्रशिक्षण देत असत.

एके दिवशी त्यांच्या खांद्यावर बसून जात असताना, वाटेत ते थकले आणि त्यांनी मला खाली उतरविले व एका खडकावर बसून त्यांच्या मांडीवर बसविले आणि मला विचारले, "बाळा, तू मोठा झाल्यावर मला काय देशील?"

काय उत्तर द्यावे हे मला कळेना म्हणून मी त्यांना घट्ट मिठी मारली आणि गंभीरपणे त्यांच्या चेहऱ्याकडे पाहिले आणि नंतर आम्ही पुढे चालू लागलो.

आजोबांनी विचारलेल्या प्रश्नाचा माझ्या मनावर फार मोठा प्रभाव पडला. मला नेहमीच त्यांना काहीतरी द्यावेसे वाटे. त्या दिवसात मंडळीमध्ये उपासनेला जाणाऱ्या लोकांना देखील ख्रिस्ताद्वारे मिळणाऱ्या उध्दाराविषयी समज नव्हती. माझे आजोबा जे नियमितपणे उपासनेला जात असत आणि स्थानिक मंडळीत पुष्कळ भाग घेत असत, त्यांना देखील मृत्युनंतर ते कोठे जाणार हे माहित नव्हते.

मी तरुण मुलगा झालो आणि ख्रिस्ता विषयीचे ज्ञान प्राप्त झाले, तेव्हा प्रभुने मला आजी आणि आजोबांच्या बाबतीत ओझे. दिले मी एकदा त्यांच्या सोबत बसलेलो असताना, त्यांना सहज प्रश्न केला, "आजोबा, स्वर्गात जाण्याकरिता आपल्याला काय करावे लागेल ?" ते म्हणाले "केवळ आपले पाळकच स्वर्गात जातील !" त्या उत्तराने माझ्या ह्रदयाला स्पर्श केला. पवित्र आत्म्याने मला भोळ्या असमंजस ख्रिस्ती जनांमधील अज्ञान काढून टाकण्यासाठी मी काहीतरी करावे म्हणून मला प्रवृत्त केले.

मी तरुण झाल्यानंतर, दैवी मार्गदर्शनानुसार कन्याकुमारी जिल्ह्यातील मुत्तमच्या समुद्रकिनाऱ्या जवळील एका हॉल मध्ये **"एका विशेष शिबिराचे" आयोजन केले.** हे शिबिर माझे पहिले शिबिर होते, हे माझ्या **"गुड न्युज प्रेअर बॅण्ड"** नावाच्या सेवेची सुरुवात होते. मी त्यावेळे केवळ १८ वर्षाचा होतो आणि या शिबिरात प्रमुख वक्ता होतो. या शिबिरासाठी मी माझ्या सर्व मित्रांना आणि नातेवाईकांना आमंत्रण दिले होते आणि शिबिराच्या ठीकाणी आम्ही दुपारच्या जेवणाची पाकीटे घेऊन बैलगाडी मधुन प्रवास केला. या शिबिरात माझे आजी-आजोबा देखील उपस्थित होते. सभेची सुरुवात झाल्यावर माझे आजी-आजोबा माझा नातु आज काय करणार आहे हे मोठ्या कुतुहलाने मजकडे पहात विचार करीत होते. ते बेचैन होते.

परंतु मी अजिबात घाबरलेला नव्हतो आणि मोठ्या धीटपणे माझ्या स्थानिक मंडळीच्या शब्बाथ शाळेत शिकलेली गाणी गात होतो. संदेशाची वेळ झाल्यावर मी मत्तय २१:१ ते १० या वचनांमध्ये गाढव सोडवून आणण्याची जी घटना दिलेली आहे त्यावर संदेश दिला व संदेशाच्या शेवट "माझ्या मुला, माझ्या मुली तुझे अंत:करण मला देशील काय" हे गीत गाऊन केले. सर्व उपस्थित हे गात असताना, "माझे आजी-आजोबा अगदी लहान बाळका सारखे हुंदके देत रडत-रडत पुढे आले आणि माझ्या समोर उभे राहिले आणि येशू ख्रिस्ताच्या द्वारे मिळणाऱ्या तारणाची त्यांना गरज आहे असे जाहीर करून पश्चाताप केला. त्यांनी अगदी प्रथमच ख्रिस्ताचा तारणारा म्हणून स्विकार केला. आम्ही सर्वजण संध्याकाळच्या वेळी अनंतकालीक जीवनाची आशा घेऊन घरी परतलो. त्यानंतर फारच थोड्या वर्षांनी पुनरुत्थानाच्या आशेसहित दोघांनीही अनंतकालीक गौरवात प्रवेश केला.

ती दोघे माझ्या सेवेतील प्रथम फळ होते. आता जरी पन्नास पेक्षा जास्त वर्षांचा कालावधी लोटला तरी त्यांच्या आठवणी मात्र मनात अगदी ताज्या आहेत. त्यानंतर आतापर्यंत देवाने मला भारतात आणि जगभरातील अनेक देशांत शुभवर्तमान, स्वर्गीय शांती आणि सार्वकालीक जीवना विषयीचा संदेश देण्यास घेऊन गेला आहे.

प्रिय बंधुनो आणि बहिणींनो, तुम्ही तुमच्या कुटुंबातील, तुमच्या नातेवाईकांनी आणि गावातील प्रियजनांच्या तारणासंबंधी व अनंतकालीक जीवना विषयी आजपर्यंत कधीतरी विचार केला आहे का ? आजकाल आधुनिक युगातील उपदेशक स्वत:च्या आई-वडिलांचा, मुलांचा आणि आप्तेष्टांच्या तारणाकडे विचार दुर्लक्ष करुन जगभरात फिरत आहेत. तुमच्या कुटुंबातील आणि आप्तेष्टांना ख्रिस्ताच्या प्रिती विषयी सांगितले तर फार मोठे पारितोषिक तुमच्याकडे पहात आहे. नव्या जन्माचा अनुभव, पवित्रतेचे जीवन, देवाची सेवा करणे, न्याय आणि अनंतकालीक जीवन या सर्व सत्य गोष्टी सत्य आहेत. देव तुम्हाला आशीर्वाद देवो.

❖ ❖ ❖

RNI NO. 70106/98, Postal Regn. No. TN/CH/(C)/206/18-20 WPP NO. TN/PMG(CCR)/WPP-261/18-20

# ECHO OF HIS CALL

Monthly magazines in 16 languages, Bible Colleges, Postal Courses, Church Planting, Village English High School, Gospel Printing Press, Crusades, Seminars, Social Services, etc.

**Annual Subscription : Rs. 100/-**
**Life Subscription : Rs. 2000/-**

The Multifarious activities of **Echo of His Call Ministry** is supported by the free-will offeerings and donations of the God's children like you. You may support Echo of His Call and its activities as the Lord leads you. We need your help to send forth the Gospel to the unreached people and plant Churches.

If you would like to receive **ECHO OF HIS CALL** magazines regularly, please write to us. Whenever you change your postal or e-mail addresses, please do inform us your old and new address.

**Echo Of His Call** is available in 16 langues in our websites also. You can read it by going into the site as well as downloading it and get bleassed.

Your letters, prayer requests and your financial helgs (by D.D., Cheque, M.O. etc) to **ECHO OF HIS CALL** may be seat to the address below

Please send your **Land Phone / Cell Phone Numbers and E.mail addresses far updation.**

## ECHO OF HIS CALL

10, MOHAMMED ABDULLAH STREET, CHEPAUK
CHENNAI-600 005, INDIA
PH:(+91-44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766,
Cell:(+91) 98410 71852, 95661 31858
E-mails: sam@echoofhiscall.org
biblecor@yahoo.co.in
Websites: www.echoofhiscall.org/
www.echoofhiscall.com

YOU CAN SEND YOUR DONATIONS ON ONLINE ALSO

## आमच्या मुख्यालयातील सेवाकार्या करीता कृपया प्रार्थना करा :-

१. प्रार्थना सेवा : २४ तास
२. **बायबलकोर** - पत्रव्यवहाराद्वारे बायबल अभ्यासक्रम : इंग्रजी, तामीळ, हिन्दी
३. **एको ऑफ हिज कॉल** - मासिक :
इंग्रजी, तामिळ, मल्यालम, तेलगु, हिन्दी, कन्नडा, मराठी, गुजराती, बंगाली, उडीया, नेपाळी, आसामी, पंजाबी, उर्दु, सिंहली आणि आफ्रिकन
४. नहेम्या बायबल कॉलेज : (दोन केंद्रे)
५. पत्रव्यवहाराद्वारे थियॉलॉजीकल अभ्यासक्रम : इंग्रजी आणि तामिळ
६. महान सेवा भागीदार (नेटवर्क ऑफ पास्टरस)
७. प्रशिक्षण कार्यक्रम
८. धर्मसभा
९. हस्तपत्रिका वितरण आणि मागोवा (पाठपुरावा)
१०. शुभवर्तमान साहित्य छापण्याचा मुद्रणालय
११. सेंट पॉलस् मॅट्रिक्युलेशन स्कूल : गावातील इंग्रजी शाळा
१२. शब्बाथ शाळा : सकाळी ८.३०वा. आणि सायं. ४ वा.
१३. **तामिळ उपासना** : ५.३० वा. पहाटे, ७ वा. सकाळी आणि १० वा. सकाळी
१४. मल्यालम उपासना : रविवारी दुपारी ३ वा.
१५. तेलगू उपासना : रविवारी दुपारी ४ वा.
१६. हिन्दी उपासना : रविवारी सायंकाळी ५ वा.
१७. इंग्रजी/तामिळ उपासना : रविवारी सायंकाळी ६ वा.
१८. पाळकांचे समोपदेशन : रविवारी दुपारी ४ वा.
१९. स्त्रियांची प्रार्थना : बुधवारी सायंकाळी ५.३० वा.
२०. प. शास्त्राभ्यास : बुधवारी सायंकाळी ६.३० वा.
२१. पुरुषांची प्रार्थना : शुक्रवारी सायंकाळी ७ वा.
२२. कर्मचाऱ्यांची सभा : शनिवारी सांयकाळी ६ वा.
२३. गृह प्रार्थना सभा : सोमवार/मंगळवार सांयकाळी ६.३०वा.
२४. विशेष पवित्र सहभागीता : प्रत्येक महिन्याच्या पहिल्या दिवशी पहाटे ५.३० वा.
२५. सेवकार्याचे सिंहावलोकन : पहिला शनिवार सांयकाळी ६.३०वा.
२६. पालकांची प्रार्थना : पहिला रविवार दुपारी ४ वा.
२७. रात्रीची प्रार्थना : दुसरा शुक्रवार रात्रौ ९.३० वा.
२८. उपवास प्रार्थना : पहिला शनिवार सकाळी ९.३० वा.
२९. पवित्र सहभागिता : दुसऱ्या रविवारच्या उपासनांमध्ये
३०. सकाळचे मनन : दररोज पहाटे ५.३० वा.
३१. कर्मचारी मनन : दररोज सकाळी ९ वा.
३२. कार्यालय : सकाळी ९ ते रात्री ९ वा.(रविवार सोडून)

**RNI NO. 70106/98**
**Postal Regn. No. TN/CH/(C)/206/18-20**
**WPP NO. TN/PMG(CCR)/ WPP- 261/18-20**
**Date of Publication: Second week of every month**
**Date of Posting : 11th & 12th of every month**
**Posted at "Egmore RMS / 1 Patrika Channel"**
**on 13th JANUARY 2020**
**If un-delivered please return to:**
**ECHO OF HIS CALL (MARATHI)**
**P.O. Box No. 2957,**
**Chepauk, Chennai - 600 005, INDIA.**
**Phone: (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766**

***JESUS LOVES YOU!***

**To**

*GOD BLESS YOU!*

Owned and published by **S. Sam Selva Raj** from No.18, Mohammed Abdullah Street, Chepauk, Chennai-600 005 and printed by him at **Echo of His Call Printers** No. 18, Mohammed Abdullah Street, Chepauk, Chennai-600 005. Editor: **S. Sam Selva Raj.**